महाराष्ट्र शासन
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१
Email Id – jdhepune@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिसर्स/उशि/पुवि/पीएमएस शिष्यवृत्ती/२०२०-२१/1926 दिनांक : २१.०९.२०२०
22.09.2020

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

विषय : - **केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी NSP पोर्टलवरुन महाविद्यालयांची KYC करणेबाबत तसेच अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यवाहीबाबत..**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालनालयाचे ईमेलद्वारे प्राप्त पत्र क्र. उशिसं-२०२०/शिष्यवृत्ती/केंद्रपुरस्कृत अल्प./ ५९८५ दि १५.०९.२०२०.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या एन.एस.पी. पोर्टलद्वारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत १. केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना, २. महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, ३. अपंग विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना या तीन योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येते. सदरहू योजनेची सविस्तर माहिती संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सर्व महाविद्यालय / संस्था यांना त्यांचे लॉगीनमधून ऑनलाईन पध्दतीने AISHE / U-DISE / NCVT / SCVT CODE सह NSP पोर्टलवर पुनर्नोंदणी करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. परंतु अद्यापही काही महाविद्यालयांनी पोर्टलवर पुनर्नोंदणी केलेली नाही. तसेच ज्या महाविद्यालयांची नोंदणी केलेली आहे परंतु अॅप्रुवल घेतलेले नाही (KYC) त्यांनी तात्काळ KYC अवलोकन करुन घेणे बाबत सर्व महाविद्यालय / विद्यालय / संस्था / विद्यापीठांना सदर पत्राद्वारे सूचना देण्यात येत आहे. त्यामुळे सर्व महाविद्यालय / विद्यालय / संस्था / विद्यापीठातील पात्र विद्यार्थ्यांना उपरोक्त शिष्यावृत्ती योजनेचे अर्ज भरता येतील.

NSP पोर्टलवरुन शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. ३१ ऑक्टोबर, २०२० आहे. महाविद्यालयाने पुनर्नोंदणी करुन Verification (KYC) बाबतची प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय संबंधित महाविद्यालयाला त्यांचे लॉगिनमध्ये विद्यार्थ्यांचे अर्ज दिसणार नाहीत. NSP पोर्टलवर मा. संचालनालयाकडून Verification (KYC) करुन घेणे प्रलंबित असलेल्या महाविद्यालयांचे Verification (KYC) तात्काळ पूर्ण करणे आवश्यक आहे.

तरी सदर विषयाचे गांभिर्य विचारात घेऊन Verification (KYC) करुन घेणे. प्रलंबित असलेल्या महाविद्यालयांना त्यांचे NSP पोर्टलवर भरलेले रजिस्ट्रेशन फॉर्म आवश्यक त्या कागदपत्रांसह मा. संचालनालयास schol.dhepune@gov.in या ईमेल वर तातडीने पाठविण्यात यावेत, सादर करावेत.

मार्गदर्शक सूचना Guidelines व FAQs काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व महाविद्यालयांना आणि विद्यापीठांना कार्यवाही करण्याबाबत सूचित करण्यात येत आहे. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नविन व सुधारित प्राप्त होणा-या सूचनांसाठी www.scholarships.gov.in आणि www.dhepune.gov.in व www.jdhepune.info या संकेतस्थळाचे अवलोकन महाविद्यालयांनी आणि विद्यापीठांनी तसेच विद्यार्थ्यांनी करण्यात याव्यात.

**अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेचे अद्यापपर्यंत अत्यल्प प्रमाणात अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यामुळे ही योजना राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व महाविद्यालय / शैक्षणिक संस्था यांचे प्राचार्य / विभागप्रमुख यांनी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना २०२०-२१ साठी सूचना तसेच पात्रतेबाबत नियमावली याबाबतची माहिती असलेले बॅनर सूचना फलकाद्वारे / दर्शनी भागामध्ये विद्यार्थ्यांसाठी लावण्यात यावेत. तसेच विद्यार्थ्यांना एसएमएस किंवा सोशल मिडीयाच्या विविध माध्यमांद्वारे सदर योजनेची संपूर्ण माहिती पाठविण्यात यावी. जेणेकरुन जास्तीत जास्त विद्यार्थी या शिष्यवृत्तीचा लाभ घेतील यासाठी प्रयत्न करावे. तसेच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीबाबतच्या ऑनलाईन अर्ज करण्यासाठी येणाऱ्या अडचणींचे निराकरण करावे. तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावेत तसेच उपरोक्त सूचना विद्यालय /महाविद्यालय/संस्था/ विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करण्यात यावी व त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर योजनेसाठी एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित रहाणार नाही याची गांभीर्याने दक्षता घेण्यात यावी.**

**(डॉ. मोहन खताळ)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रति - १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांना माहितीसाठी सादर.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. प्राचार्य, तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्था.
८. प्राचार्य, वैद्यकिय महाविद्यालये.
९. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे १.
१०. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, नाशिक.